ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २०२ • शनिवार दि.९ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## विशेष संपादकीय

### संघर्षाच्या लाल वाटेवरील एक निष्ठावंत शिलेदार

**किनवट तालुक्याच्या सामाजिक, राजकीय आणि श्रमिक चळवळीच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण पर्व आज संपले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते, किनवट नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष आणि डाव्या विचारसरणीचे निष्ठावान कार्यकर्ते कॉम्रेड गंगारेड्डी बैनमवार यांच्या निधनाने केवळ एक व्यक्ती हरपलेली नाही, तर स्वातंत्र्योत्तर काळातील श्रमिक जनतेच्या संघर्षाचा एक साक्षीदार आणि नेतृत्व करणारा दीपस्तंभ हरपला आहे. त्यांच्या जाण्याने किनवट-माहूर परिसरातील डाव्या चळवळीवर न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. कॉम्रेड गंगारेड्डी बैनमवार हे नाव म्हणजे संघर्ष, प्रामाणिकपणा, पक्षनिष्ठा आणि जनतेप्रती असलेली अपार बांधिलकी यांचे प्रतीक होते. विद्यार्थी दशेपासून त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाची विचारधारा स्वीकारली आणि आयुष्यभर ती तितक्याच निष्ठेने जपली. सत्तेच्या मोहापेक्षा विचारांना महत्त्व देणाऱ्या मोजक्या नेत्यांमध्ये त्यांची गणना होत असे. खांद्यावरचा लाल बावटा त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत अभिमानाने सांभाळला. दिवंगत माजी आमदार सुभाष जाधव, कॉ. व्यंकटराव आडे, कॉ. उत्तमराव राठोड यांसारख्या ज्येष्ठ डाव्या नेत्यांचे ते अत्यंत जवळचे सहकारी होते. या सर्वांनी मिळून किनवट-माहूर परिसरात श्रमिक, शेतकरी, शेतमजूर आणि वंचित समाजाच्या प्रश्नांवर मोठे जनआंदोलन उभे केले. कॉम्रेड गंगारेड्डी यांनी या चळवळींमध्ये केवळ सहभाग घेतला नाही, तर स्वतःला पूर्णपणे झोकून दिले. त्यांचे संपूर्ण आयुष्य हे अन्यायाविरोधातील अखंड संघर्षाचे उदाहरण होते. किनवट नगरपरिषदेमध्ये त्यांनी दीर्घकाळ नगरसेवक आणि उपनगराध्यक्ष म्हणून काम केले. सार्वजनिक जीवनात राहूनही त्यांनी कधी वैयक्तिक लाभाचा विचार केला नाही. सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रशासनाशी संघर्ष करणे, गरीबांच्या अडचणी सोडवणे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हेच त्यांचे ध्येय होते. त्यामुळेच सर्वसामान्य जनतेमध्ये त्यांच्याविषयी अपार आदर आणि विश्वास होता. शिक्षण, सामाजिक जाणीव आणि संघटन या क्षेत्रांतही त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले. माजी खासदार कै. उत्तमराव राठोड यांच्या किनवट शिक्षण संस्थेच्या बळीराम पाटील महाविद्यालयाचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी, सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षण हेच प्रभावी साधन आहे, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. कॉम्रेड गंगारेड्डी बैनमवार हे केवळ राजकीय नेते नव्हते, तर अनेक तरुण कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्थान होते. त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येकाला त्यांनी संघर्षाची, निष्ठेची आणि विचारांप्रती प्रामाणिक राहण्याची शिकवण दिली. आजच्या स्वार्थी आणि सत्ताकेंद्री राजकारणात त्यांनी जपलेली मूल्ये अधिक अधोरेखित होतात. त्यांच्या निधनाने आम्ही पोरके झालो ही भावना अनेक कार्यकर्त्यांच्या मनात उमटत आहे. कारण त्यांनी आयुष्यभर माणसे जोडली, कार्यकर्ते घडवले आणि चळवळीला दिशा दिली. सहा दशकांहून अधिक काळ धगधगणारा हा संघर्षाचा ज्वालामुखी आता शांत झाला असला, तरी त्यांनी दिलेली विचारांची ऊर्जा आणि संघर्षाची प्रेरणा कायम जिवंत राहील. समाजवाद, समानता आणि शोषणमुक्त समाजरचनेचे स्वप्न त्यांनी आयुष्यभर पाहिले. आज त्यांच्या जाण्याच्या दुःखात बुडून न जाता, त्यांनी अपूर्ण ठेवलेली स्वप्ने पूर्ण करण्याचा संकल्प करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यामध्ये, गरीबांच्या हक्कासाठी लढणाऱ्या प्रत्येक संघर्षात आणि लाल बावट्याच्या प्रत्येक फडकण्यात कॉम्रेड गंगारेड्डी बैनमवार यांची आठवण कायम जिवंत राहील. अशा या जनतेच्या लढवय्या नेत्याला भावपूर्ण आदरांजली आणि अखेरचा लाल सलाम!**

# पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रिपदी शुभेंदू अधिकारी विराजमान

## शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अनेक मान्यवरांची हजेरी



कोलकत्ता : पश्चिम बंगालच्या राजकीय इतिहासात भाजपच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले आहे. भारतीय जनता पक्षाचे नेते शुभेंदू अधिकारी यांनी आज राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. कोलकाता येथील ऐतिहासिक ब्रिगेड परेड ग्राऊंडवर झालेल्या एका भव्य सोहळ्यात राज्यपाल आर. एन. रवि यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह देशातील दिग्गज नेते उपस्थित होते.

या विधानसभा निवडणुकीत भाजपने २९३ पैकी २०७ जागांवर प्रचंड विजय मिळवून पूर्ण बहुमत प्राप्त केले आहे. तर १५ वर्षे सत्तेत असलेल्या ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला केवळ ८० जागांवर समाधान मानावे लागले. स्वतः शुभेंदू अधिकारी यांनी भवानीपूर मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा पराभव करत 'जायंट किलर' ठरले होते.

शपथविधी सोहळ्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी, शुभेंदू अधिकारी आणि प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य एका विशेष रथावरून व्यासपीठाकडे रवाना झाले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या सहकाऱ्यांचे आशीर्वाद घेतले, तसेच अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचीही भेट घेतली.

या सोहळ्याला गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, नितीन नवीन, योगी आदित्यनाथ यांच्यासह केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. सुमारे २० राज्यांचे मुख्यमंत्री या सोहळ्याचे साक्षीदार बनले.

शुभेंदू अधिकारी हे पश्चिम बंगालचे ९ वे मुख्यमंत्री बनले आहेत. शुक्रवारीच अमित शाह यांच्या उपस्थितीत त्यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड झाली होती. बंगालमध्ये पहिल्यांदाच भाजपचे सरकार स्थापन झाल्याने **पान ४ वर**

## जिल्ह्यात दोन दिवसासाठी यलो अलर्ट जारी

नांदेड/प्रतिनिधी-प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी आजश (शनिवार) दि. ९ मे रोजी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि.९ व १० मे २०२६ या दोन दिवसासाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादीचे नेते विकास लवांडे यांच्यावर शाईफेक

पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर शाईफेक झाल्याच्या घटनेमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटलं आहे. कीर्तनकार संग्राम भंडारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून विकास लवांडे यांच्यावर शाईफेकचा हल्ला करण्यात आला.



या घटनेनंतर आपल्याला जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप विकास लवांडे यांनी केला आहे. विकास लवांडे यांनी वारकरी संप्रदायात काही घुसखोर घुसल्याचा आरोप करत काही नावे घेतली होती. याच मुद्द्यावरुन वातावरण तापलं आहे. त्यांनी जाहीर केलेल्या यादीत संग्राम भंडारे यांचंदेखील नाव होतं, अशी माहिती समोर येत आहे. विकास लवांडे यांच्यावरील शाई हल्ल्याचा व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओत शाईफेक करणारे संग्राम भंडारे हे विकास लवांडे यांना इशारा देताना दिसत आहेत. आमचं सर्वस्व आहे ते, तू परत आमच्या गुरुवर्यांना बोललास तर तू लक्षात ठेव, असं कीर्तनकार संग्राम भंडारे व्हिडीओत बोलताना दिसत आहेत. या घटनेनंतर विकास लवांडे पुण्यातील लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दाखल झाले. या प्रकरणात गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी त्यांची आहे. आपल्याला पिस्तूल दाखवून जीवे मारण्याचा प्रयत्न झाला, असा देखील आरोप विकास लवांडे यांनी केला आहे.

# अहमदपुर येथे जुगार अड्ड्यावर डीआयजीच्या पथकाची धाड

नांदेड/प्रतिनिधी-अहमदपुर (जि.लातूर) तालुक्यातील मौ. काजळ हिप्परगा येथे सुरु असलेल्या जुगार अड्डयावर नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरिक्षक कार्यालयातील पथकाने धाड टाकुन ९ जणांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून ३ लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला.

मौजे काजळ हिप्परगा येथील विसावा बार ॲण्ड रेस्टारंटच्या दुसऱ्या मजल्यावर जुगार अड्डा सुरु असल्याची तक्रार विशेष पोलीस उपमहानिरिक्षक कार्यालयाकडे मिळाली. विशेष पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशावरुन फौजदार पंकज इंगळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांच्या एका पथकाने शुक्रवारी सायंकाळी सदरील जुगार अड्डयावर छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना पोलीसांनी ९ जणांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून ५८ हजार रुपये रोख, ९ मोबाईल,४ दुचाकी असा ३ लाख ४५ हजार **पान ४ वर**

# पंजाबच्या मंत्र्याला ईडीने केली अटक

नवी दिल्ली : पंजाबमध्ये असलेल्या आम आदमी पक्षाच्या सरकारला शनिवारी मोठा धक्का बसला आहे. पंजाबचे मंत्री संजीव अरोरा यांना अंमलबजावणी संचालनालयाने अटक केली आहे. बनावट जीएसटी खरेदी बिले आणि १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या मनी लाँड्रिंगच्या कथित प्रकरणात ईडीने शनिवारी सुमारे ७ तास चाललेल्या छाप्यानंतर अरोरा यांना अटक केली.

त्यांना चंदीगडमधील त्यांच्या शासकीय निवासस्थानातून अटक करण्यात आली. ईडीने शनिवारी सकाळी चंदीगडसह अरोरा यांच्या अनेक ठिकाणी छापे टाकले. यामुळे आता मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या सरकारला मोठा धक्का बसला आहे. त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधत ईडीने केलेल्या कारवाईचा निषेध केला आहे. पंजाबचे मंत्री संजीव अरोरा यांच्या घरी शनिवारी सकाळी ईडीने छापेमारी केली. ईडीचे अधिकारी तब्बल २० वाहने घेऊन थेट संजीव अरोडा यांच्या घरी पोहोचले. संजीव अरोरा यांचे घर चंडीगड सेक्टर दोन येथे सकाळी ७ वाजून २५ मिनिटांनी ईडीचा ताफा दारात आल्याने सर्वच चकित झाले होते.

# ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉ.गंगारेड्डी बैनमवार यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा किनवट नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष कॉ. गंगारेड्डी बैनमवार यांचे आज पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८० वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुली, सुना, जावई आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.



कॉ. गंगारेड्डी बैनमवार हे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे आजीवन सभासद होते. किनवट नगरपरिषदेत ते दीर्घकाळ नगरसेवक म्हणून निवडून आले होते. त्यांनी दोन वेळा उपनगराध्यक्षपद भूषविले तसेच विविध समित्यांचे सभापती म्हणूनही काम पाहिले. कॉ. व्ही. डी. देशपांडे, अनंतराव नागापूरकर, गोपाळराव कुर्तडीकर, उस्मान खान आणि सरदार खान यांच्या प्रेरणेतून विद्यार्थी दशेतच त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतला. दिवंगत आमदार सुभाष जाधव यांच्या सोबत खांद्याला खांदा लावून त्यांनी किनवटमध्ये पक्ष संघटना मजबूत केली. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय कम्युनिस्ट पक्ष दीर्घकाळ नगरपरिषदेत सत्तेत राहिला. पक्षात त्यांनी जिल्हा सचिव, राज्य कौन्सिल सदस्य आदी विविध पदांवर कार्य केले होते. त्यांच्या निधनामुळे पक्षाच्या वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय सचिव भालचंद्र कानगो यांनी श्रद्धांजली अर्पण करताना, कॉ. गंगारेड्डी बैनमवार यांच्या निधनाने पक्षाचा एक निष्ठावंत शिलेदार आणि सहकारी गमावला आहे, अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या. तसेच भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कौन्सिल सदस्य प्रदीप नागापूरकर यांनी राजकारणात पक्षनिष्ठा कशी जपावी हे शिकवणारे पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आपण गमावले आहे. त्यांच्या निधनाने पक्षाची कधीही न भरून येणारी हानी झाली आहे, अशा शब्दांत श्रद्धांजली वाहिली.

# गोकुंदा येथे जल जीवन मिशन योजनेअंतर्गत वाढीव पाणी पुरवठा योजनेचे काम रखडले



किनवट/प्रतिनिधी- जल जीवन मिशन योजनांतर्गत गोकुंदा शहरात वाढीव पाणी पुरवठ्यासाठी चौदा कोटी रुपयाच्या नवीन नळयोजनेचे काम निधीअभावी रखडले आहे. तर जुन्या नळयोजनेची विहीर कोरडीठाक पडलीय. शासनाच्या अर्धवट वांझोट्या नळ योजनेतून ना जल, ना जीवन, पाण्यासाठी त्राहीमाम निर्माण झालीय. विंधन विहिरी तयार करण्यावर ग्रामपंचायतीने जोर दिला आहे. कंत्राटदाराने उचल केलेला निधी आणि केलेल्या कामाचे मूल्यमापन करून अनियमितता आढळून आल्यास कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

जलही जीवन आहे परंतु शासनाच्या आर्थिक दुर्बलतेमुळे पेसा अंर्तगतच्या गोकुंदावाशियांची चौदा कोटी रुपयांची वाढीव पाणी पुरवठ्यासाठी नवीन नळयोजना देऊन चेष्टा केली आहे. पहिल्याच टप्प्यातील अर्धवट कामांची गुंडाळपट्टी करून कंत्राटदाराने धूम ठोकल्यामुळे भविष्यात ती नळयोजना पूर्ण होऊन गोकुंदावाशियांचा कायमचा पाणी प्रश्न मिटेल या अपेक्षा फोल ठरल्या आहेत. मुख्य टाकी आणि पाणी पुरवठा करणाऱ्या टाकीचे थडगे उभारले असून देयक रक्कम घेऊन कंत्राटदार काम सोडून निघून गेल्याचे सुत्रांनी सांगितले. लोकसंख्येच्या तुलनेत पाणी पुरवठा करणाऱ्या साधनसामग्रीची कमतरता जाणवत आहे. नवीन नळयोजनेचे तीन तेरा वाजविले आहे. मग जुन्या नळयोजनेने तरी ग्रामस्थांची तहान भागवावी असे ग्रामपंचायतीला वाटले तरी विहिरीचा तळच कोरडा पडल्यामुळे त्यांचाही नाइलाज झाला आहे. म्हणून विंधन विहिरीवर जोर दिल्याचे समजते. विंधन विहिरींचा उपक्रम तसा लोकांची तहान भागवण्यासाठी चांगलाच. सरपंच विरुद्ध उपसरपंच अशी स्थिती निर्माण झाल्याने त्याचा विपरीत परिणाम हा शहराच्या विकासावर होणार नाही यासाठी दोन्हीही पक्षकारांनी सजगता बाळगायला हवी असे सुजाण नागरिकांचे म्हणणे आहे.

# अमेरिकेचा ऱ्हास की नव्या शक्तीचा उदय? चीनच्या गोटात कमालीची अस्वस्थता

जागतिक स्तरावर घडलेल्या अनेक खळबळजनक घटनांमुळे बीजिंगमध्ये (चीनमध्ये) एका नव्या चर्चेला उधाण आले आहे, अमेरिकेची सत्ता खरोखरच क्षीण होत आहे की ती अधिक आक्रमक पुनरुत्थानाच्या एका नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे?

२८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने तेहरानवर हवाई हल्ले केले, ज्यामध्ये इराणच्या सर्वोच्च नेत्याचे कार्यालय आणि राष्ट्रपती भवन यांनाही लक्ष्य करण्यात आले. या घटनेनंतर चीनच्या धोरणात्मक वर्तुळात एक मोठी चर्चा सुरू झाली की अमेरिकेची ताकद कमी होत आहे की पुन्हा वाढत आहे. या महासत्ता स्पर्धेत वॉशिंग्टन हरत आहे की जिंकत आहे, यावर प्रश्न उपस्थित झाले.

या चर्चेची पार्श्वभूमी ऑक्टोबर २०२५ मधील ट्रम्प आणि शी यांच्यात झालेल्या बुसान शिखर परिषदेपर्यंत जाते. त्यानंतर चीनमध्ये असा विचार वाढला की व्यापारयुद्धात चीनने मोठ्या प्रमाणात यश मिळवले आणि अमेरिकेला अडचणीत टाकले. या मतानुसार, अमेरिकेच्या कठोर धोरणांमुळे चीनला मागे हटवण्यात यश आले नाही, उलट अमेरिकेत महागाई वाढली आणि उत्पादनक्षमता कमी झाली. त्यामुळे ट्रम्प प्रशासनाला हे मान्य करावे लागले की कठोर धोरणांनी चीनवर विजय मिळवता येणार नाही आणि चीनच्या अटी मान्य करण्याशिवाय पर्याय नाही.

चीनी तज्ज्ञांच्या मते, यामुळे अमेरिका आणि चीनच्या संबंधांमध्ये एक नवीन टप्पा सुरू झाला आहे. या टप्प्यात जागतिक व्यवस्था बदलत आहे, जिथे चीनची ताकद आणि प्रभाव वाढत आहे, तर अमेरिका तुलनेने कमकुवत होत आहे. या दृष्टिकोनातून चीन आपला प्रभाव वाढवण्याचा आणि जागतिक स्तरावर आपले नरेटिव्ह (कथानक) तयार करण्याचा प्रयत्न करत आहे. याच संदर्भात चीनी माध्यमांनी पूर्वेचा उदय आणि पश्चिमेची घसरण हे नरेटिव्ह पुढे आणले आहे आणि चीनची व्यवस्था अमेरिकेपेक्षा अधिक प्रभावी आणि स्पर्धात्मक असल्याचा दावा केला आहे. ही चर्चा फक्त अमेरिका-चीन संबंधांपुरती मर्यादित नसून, भविष्यातील शक्ती संतुलन आणि संभाव्य जी२ व्यवस्थेबद्दलही आहे.

दरम्यान, किल लाइन या अमेरिकन चर्चेने चीनी सोशल मीडियावर लोकप्रियता मिळवली, ज्यामध्ये असे म्हटले जाते की अमेरिका आता प्रगत नाही, तिचे उद्योग कमजोर झाले आहेत, वित्तीय व्यवस्था काही मोजक्या लोकांच्या ताब्यात आहे आणि सामाजिक विषमता वाढली आहे. तसेच, अमेरिका आपली लष्करी ताकद, पायाभूत सुविधा आणि जागतिक व्यवस्था टिकवून ठेवण्याची क्षमता गमावत आहे, असा दावा केला जातो आणि त्यामुळे जग आता अमेरिका-पश्चिमोत्तर काळात प्रवेश करत आहे, असे मत मांडले जाते.

मात्र, वर्षाच्या सुरुवातीला ट्रम्प यांच्या व्हेनेझुएला प्रयोगामुळे चीनमधील सार्वजनिक चर्चेत काहीसा बदल दिसू लागला. काही विश्लेषकांनी असे सांगायला सुरुवात केली की व्यापारयुद्धात चीन जिंकला अशी धारणा असली तरी, अलीकडच्या काळात ट्रम्प प्रशासनाच्या काही निर्णयांमुळे चीनला धक्के बसले आहेत. यात जर्मनीतील हॅम्बुर्ग बंदरातील गुंतवणुकीत घट, नेदरलँड्समधील नेक्स्पेरियाशी संबंधित अडचणी, ऑस्ट्रेलियातील डार्विन बंदराचा भाडेपट्टा रद्द होण्याची शक्यता आणि पनामा येथील महत्त्वाच्या बंदरांवरील नियंत्रण कडून गमावणे यांचा समावेश आहे.



या दृष्टिकोनातून पाहिल्यास, चीनच्या परदेशातील गुंतवणुका, जागतिक बाजारपेठांतील औद्योगिक साखळ्या, व्यापार मार्ग आणि संसाधन पुरवठा नेटवर्क हे ट्रम्प २.० काळात मोठ्या जोखमींचा सामना करत आहेत. काही टीकाकारांच्या मते, अमेरिका-चीन शक्ती संतुलन बदलत असल्याचा दावा होत असला तरी, चीन आपले परदेशातील आर्थिक हितसंबंध प्रभावीपणे सुरक्षित ठेवण्यात कमी पडत आहे.

काही चीनी विद्वानांनी अशीही चिंता व्यक्त केली आहे की, अमेरिका कमजोर होत असल्याचे जरी म्हटले जात असले तरी, ट्रम्प २.० ने प्रत्यक्षात अनेक क्षेत्रांमध्ये महत्त्वाचे यश मिळवले आहे.

तरी, ट्रम्प २.० ने अनेक क्षेत्रांमध्ये प्रत्यक्षात यश मिळवले आहे. उदाहरणार्थ, या दृष्टिकोनातून पाहता, अमेरिकेने गेल्या वर्षी इराणवर हल्ले केले आणि त्याचे मोठे परिणाम भोगावे लागले नाहीत, तर मध्यपूर्वेतील देशांनी २ ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणुकीची आश्वासने दिली. त्यांच्या मते, ट्रम्प २.० ने जगभरात मोठ्या प्रमाणावर टॅरिफ लादले, तरी त्याला ठोस विरोध झाला नाही. उलट, अनेक देशांनी अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याची तयारी दर्शवली. याशिवाय, जपान, फिलिपिन्स आणि तैवानला चीनविरुद्ध मजबूत करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न स्पष्ट असतानाही, चीन अमेरिका-चीन संबंध स्थिर ठेवण्यासाठी मोठ्या गुंतवणुकीचा विचार करत असल्याचेही सांगितले जाते.

बीजिंगमध्ये असा निष्कर्ष काढला जात आहे की अमेरिकेची माघार ही कल्पना अतिशयोक्त आहे. प्रत्यक्षात अमेरिका मागे हटत नसून चीनविरुद्ध अधिक आक्रमक भूमिका घेत आहे, जरी तिची पद्धत आणि गती बदललेली असली तरी. या मतानुसार, ट्रम्प २.० मुळे चीनच्या परदेशी गुंतवणुकी, व्यापार आणि औद्योगिक तसेच पुरवठा साखळ्यांवर मोठा परिणाम होत आहे, ज्यामुळे चीनच्या जागतिक विस्ताराला आव्हान निर्माण होत आहे.

चीन सेंटर फॉर इंटरनॅशनल इकॉनॉमिक एक्स्चेंजेसचे चेन वेनलिंग आणि त्सिंगहुआ विद्यापीठातील यान श्वेतोंग यांसारख्या विद्वानांच्या मते, अमेरिकेकडे अजूनही मोठी आर्थिक आणि लष्करी ताकद आहे. त्याच वेळी, चीननेही अनेक क्षेत्रांमध्ये महत्त्वाची प्रगती केली आहे. मात्र, ट्रम्प यांच्या आक्रमक धोरणांमुळे आर्थिक स्पर्धा लष्करी संघर्षात बदलण्याचा धोका आहे, कारण अजूनही दोन्ही देशांच्या एकूण शक्तीत काही अंतर आहे. तरीही, त्यांचे मत असे आहे की हे अंतर हळूहळू कमी होत आहे आणि ही प्रक्रिया थांबवता येणार नाही. जर चीनने आपले अंतर्गत प्रश्न योग्य प्रकारे हाताळले, तर भविष्यात अमेरिका-चीन संबंध अधिक नियंत्रित आर्थिक स्पर्धेकडे वळू शकतात.

### ''शांततापूर्ण उदय'' आणि प्रतिबंधक भूमिकेचे पुनर्मूल्यांकन

व्हेनेझुएला आणि पनामा येथील घडामोडींनंतर चीनमध्ये जोरदार चर्चा सुरू झाली. अनेकांचे मत असे होते की, जर चीनने ट्रम्प २.० च्या सततच्या उकसावण्यांना आत्ता ठाम उत्तर दिले नाही, तर अमेरिकेसोबतच्या स्पर्धेत तो आपली संधी गमावू शकतो.

३ मार्च रोजी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ले केल्यानंतर तीन दिवसांनी, चीनच्या लष्करी माध्यमाने अमेरिका इस्रायलच्या इराणवरील हल्ल्यांमधून पाच धडे या नावाने लेख प्रसिद्ध केला. या लेखात असे सांगितले होते की सर्वात मोठा धोका आतल्या शत्रूपासून असतो, शांततेवर अंध विश्वास ठेवणे ही मोठी चूक असते, शक्तिशाली लष्करी ताकद हे वास्तव आहे, विजयाचा भ्रम धोकादायक असतो आणि शेवटी स्वावलंबनच खरा आधार असतो.

काही चीनी तज्ज्ञांच्या मते, हा संदेश पीपल्स लिबरेशन आर्मी कडून दिलेला एक स्पष्ट इशारा होता, ज्यामध्ये चीनने शांततेच्या भ्रमातून बाहेर पडावे असे सूचित केले गेले.

वॉशिंग्टनची सध्याची कठोर आणि दबाव टाकणारी भूमिका ही त्याच्या खऱ्या ताकदीत वाढ झाल्याचे चिन्ह नाही, तर चीनच्या तुलनेत कमी होत चाललेल्या आर्थिक स्पर्धात्मकतेची भरपाई करण्याचा प्रयत्न आहे. यातून कमकुवतपणा लपवणे, वाटाघाटींमध्ये जास्त फायदा मिळवणे आणि आपले वर्चस्व टिकवून ठेवणे हा उद्देश दिसतो.

चीनी तज्ज्ञांच्या मते, यावर्षी अमेरिकेने केलेल्या कारवाया जसे की व्हेनेझुएलामधील हस्तक्षेप, ग्रीनलँडबाबतचा दबाव, पनामातील राजकीय आणि आर्थिक हालचाली तसेच इराणवरील हल्ले हे दाखवतात की महासत्ता स्पर्धा आता अधिक तीव्र झाली आहे. त्यांच्या मते, दुसऱ्या महायुद्धानंतरची आंतरराष्ट्रीय व्यवस्था आणि शीतयुद्धानंतरची उदारमतवादी चौकट, ज्यावर अनेक देशांनी विश्वास ठेवला होता, ती आता तणावाखाली आहे आणि जागतिक परिस्थिती अधिक धोकादायक बनत आहे. या पार्श्वभूमीवर, आर्थिक उदारीकरणानंतर चीनने बराच काळ शांत आणि स्थिर वातावरणात प्रगती केली, त्यामुळे देशातील अपेक्षाही शांततेवर आधारित राहिल्या. मात्र, सध्याच्या बदलांमुळे बीजिंगमध्ये धोरणांचा मूलभूत पुनर्विचार करण्याची गरज निर्माण होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

ते असा दावा करतात की चीनने अमेरिकेला जगातील सर्वात आक्रमक राष्ट्र म्हणून पाहिले पाहिजे. त्यांच्या मते, वॉशिंग्टनची सध्याची कठोर आणि दबाव टाकणारी भूमिका ही खरी ताकद वाढल्याचे चिन्ह नाही, तर चीनच्या तुलनेत कमी होत चाललेल्या आर्थिक स्पर्धात्मकतेची भरपाई करण्याचा प्रयत्न आहे. यातून कमकुवतपणा लपवणे, वाटाघाटींमध्ये जास्त फायदा मिळवणे आणि आपले वर्चस्व टिकवून ठेवणे हे उद्दिष्ट दिसते. ते असेही मानतात की ही भूमिका दीर्घकाळ टिकणारी असू शकते, कोणताही अध्यक्ष असो. अशा परिस्थितीत, चीनने आपल्या शांततापूर्ण उदयाच्या धोरणाचा पुनर्विचार करून अमेरिकेविरुद्ध प्रभावी लष्करी प्रतिबंधक क्षमता तयार करावी, असे त्यांचे मत आहे.

या महिन्याच्या अखेरीस नियोजित असलेल्या चीन भेटीला अध्यक्ष ट्रम्प यांनी दिलेला विलंब हा दोन्ही बाजूंमधील सुरू असलेल्या शक्तिसंघर्षाच्या पार्श्वभूमीवर पाहिला पाहिजे. तत्काळ कारणांमध्ये मध्यपूर्वेतील संघर्षामुळे अमेरिकेची व्यस्तता, होर्मूझ सामुद्रधुनीतील एस्कॉर्ट मिशनसंदर्भातील वॉशिंग्टन-बीजिंग मतभेद, नवीन सेक्शन ३०१ चौकशा, तसेच पॅरिसमध्ये झालेल्या चीन-अमेरिका व्यापार चर्चेच्या सहाव्या फेरीत कोणताही ठोस परिणाम न होणे यांचा समावेश असू शकतो. त्याचवेळी, व्यापक चित्र असे सूचित करते की दोन्ही बाजू स्वतःला विजेता म्हणून सिद्ध करण्यासाठी नरेटिव्ह उभारण्याचा प्रयत्न करत आहेत, तसेच राष्ट्रप्रमुखांच्या भेटीपूर्वी जास्तीत जास्त सौदेबाजी साधने गोळा करून एकमेकांकडून अधिकाधिक सवलती मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. या स्पर्धेत कोणती बाजू कितपत पुढे जाईल याचा अंदाज बांधणे कठीण असल्याने, भारताने या उच्च-जोखमीच्या स्पर्धेवर बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

# दर ५३ मिनिटाला एका चिमुकलीवर अत्याचार ;राज्यात चाललय तरी काय ?

**रमेश लांजेवार**
नागपूर.

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे अवघ्या ४ वर्षीय एका चिमुकलीवर किळसवाणे क्रौर्य ६५ वर्षांच्या नराधमाने अत्याचार करून दगडाने ठेचून खून केल्याची अत्यंत घृणास्पद घटना नसरापूर येथे शुक्रवारी उशिरा उघडकीस आली हि घटना लपविण्याकरीता नराधमाने चिमुकल्या मुलीचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून ठेवला होता.या घटनेनंतर संपूर्ण नसरापूर परिसर स्तब्ध झाला व सर्वत्र संतापाची लाट उसळली आणि याचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरात उमटले आणि ही क्रूर घटना एकुण संपूर्ण देश सुन्न झाला.राज्यात दिवसेंदिवस मुलीवरील अत्याचाराचे वाढते प्रमाण ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.असे सांगितले जाते की राज्यात दररोज २७ मुली वासनेच्या बळी ठरत आहेत.याबद्दल गेल्या १२० दिवसांत ३२७९ गुन्हे दाखल झाले आहेत.राज्यात दररोज चिमुकल्यांचे बालपण नराधमांकडुन खुडले जात असल्याचे भीषण वास्तव पोलिस दलाच्या आकडेवारीवरून समोर आले आहे. मागील वर्षांत राज्यात एकूण १० हजार १३१ पोक्सा गुन्हे दाखल झाले होते.चालू वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांतच (एप्रिल अखेर) ३ हजार २७९ गुन्हे नोंदविले गेले आहेत. या आकडेवारी नुसार राज्यात दररोज सरासरी २७ चिमुकल्या वासनेच्या बळी जात असून दर ५३ मिनिटांला एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याचा गुन्हा दाखल होत आहे.



१ जानेवारी २०२५ ते २०२६ पर्यंत तब्बल १३ हजार ४१० गुन्हे दाखल झाले आहेत.यात पुणे जिल्ह्याची स्थिती अत्यंत गंभीर आहे.पुण्यात ग्रामीण भागात एप्रिल अखेरपर्यंत १४० गुन्हे तर पुणे शहर हद्दीत या चार महिन्यात १८१ गुन्हे नोंदविले गेले.पिंपरी-चिंचवड येथेही ११८ गुन्हे दाखल आहेत.ही आकडेवारी पहाता मुलीवरील अत्याचाराची स्थिती राज्यासाठी अत्यंत गंभीर व चिंताजनक असल्याचे लक्षात येते.अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये पोलिस विभाग आपली चोख भुमिका बजावत असतांना त्यांना कायद्याच्या बाजूने मिळणारी मदत ही अत्यंत(कासवाच्या गतीने)हळूवार पणाची असल्याने अत्याचारांच्या गुन्ह्यात वाढ होत असल्याचे दिसून येते. मुलींच्या अत्याचारांच्या बाबतीत सरकारने पोलीस विभागाला खुली सुट द्यायला हवी व मुलींच्या अत्याचाराच्या प्रकरणातील संपूर्ण निकाल फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातूनच चालवायला हवेत, जेणेकरून पिडितेला व त्यांच्या परिवाराला ताबडतोब न्याय मिळु शकेल.यामुळे पोलिस विभागाच्या कारवाईला जलदगतीने चालना मिळण्यास मोठी मदत होईल व मुलींवरील अत्याचारावर आळा बसेल. देशात शक्ती कायद्यात गुन्हेगाराला २१ दिवसांत फाशी देण्याची तरतूद आहे.मात्र दुर्दैवाने हा कायदा केंद्राकडे अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित आहे.आज शक्ती कायदा राज्यात लागू असता तर नसरापूरच्या नराधमाला २१ दिवसांत फाशीची शिक्षा झाली असती आणि अशा गंभीर गुन्हेगारांवर कायद्याचा धाक बसला असता.परंतु राज्याचे दुर्दैव म्हणावे लागेल की अशा गंभीर गुन्ह्यांबद्ल राज्यात जलदगतीने निकाल लागत नाही.त्यामुळे अशा गंभीर घटनांची सरकारने गांभीर्याने दखल घेऊन फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून निकाल लावून गुन्हेगाराला फासावर लटकविले पाहिजे. नसरापूर येथील चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या आणि चाकणजवळील महाळुंगे येथे तीन वर्षीय मुलांवर (चिमुकल्यावर) अनैतिक अत्याचार करून गळा चिरून केलेल्या हत्येच्या घटनांनी महाराष्ट्रासह संपूर्ण देश हादरला असून या विरोधात प्रचंड जनक्षोभ उसळला असुन आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी सर्वत्र जोर पकडत आहे.कारण या दोन्ही घटना अंगावर शहारे येणाऱ्या व संपूर्ण महाराष्ट्राला सुन्न करणाऱ्या आहेत. आपला महाराष्ट्र संतांची भूमी म्हणून ओळखल्या जातो. परंतु नसरापूरातील नराधम आणि राज्यातील भोंदूबाबांनी राज्याला कलंकीत केल्याचे दिसून येते.हा कलंक मिटविण्यासाठी चिमुकल्यांवर अत्याचार करणाऱ्यांना, खरात सारख्या भोंदूबाबांना व त्यांना मदत करणाऱ्यांना ताबडतोब फासावर लटकविले पाहिजे. जेणेकरून पुन्हा-पुन्हा असे घृणास्पद कृत्य राज्यात दिसणार नाही यावर सरकारने सकारात्मक पाऊल उचलुन ताबडतोब कारवाई सुरू केली पाहिजे.सरकारने नुकतेच महत्वाचे पाऊल उचलले आहे त्याचे स्वागत,पोलीस दलातील विविध उच्च पदे भूषविणाऱ्या निवृत्त आयपीएस अधिकारी आणि पोलीस दलातील आपल्या धाडसी व परिणामकारक कामगिरीमुळे लेडी सुपरकॉप सन्माननीय मीरा बोरवणकर यांची महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षपदी निवड केल्याबद्दल हार्दिक अभिनंदन.कारण आता महिला आयोगाच्या मार्फत होणाऱ्या कोणत्याही अत्याचाराच्या कारवाईमध्ये राजकीय हस्तक्षेप रहाणार नाही यावरून स्पष्ट होते. आपण राज्याच्या सुरक्षेची जबाबदारी आतापर्यंत मोठ्या शिताफीने पारपाडली त्याचप्रमाणे मुलींवरील अत्याचार, अपहरण, महिलांवरील अत्याचार याला एक वेगळा आकार देऊन फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून निकाल लावून गुन्हेगारांवर आळा बसवाल अशी आम्हाला खात्री आहे.सध्या राज्यासह देशात गाजत असलेले अशोक खरात प्रकरण अत्यंत गंभीर व निंदनीय आहे. याप्रकरणाची सुध्दा आपण गांभीर्याने दखल घेऊन आपल्या पध्दतीने हाताळून समाजातील घृणास्पद कृत्यावर पडदा टाकाल अशी मला खात्री आहे.कारण अशोक खरात प्रकरण अत्यंत गंभीर आहे आणि या प्रकरणाच्या जाळ्यात मोठमोठी दिग्गज राजकीय मंडळी अडकली आहे या सर्वबाबी उघडकीस आणून न्याय व्यवस्था सुदृढ कराल अशी आम्हाला खात्री आहे.कारण महिला आयोगाच्या अध्यक्षपदी जबाबदार व्यक्तीची ही नियुक्ती नसरापूर सारख्या अन्य प्रकारणात वेळीच न्याय मिळण्याच्या आशा उंचावल्या आहेत.कारण राज्यात महिला व मुलींवरील अत्याचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत परंतु पिडितांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना न्याय मिळालेला नाही.परंतु मीरा बोरवणकर यांची नियुक्ती झाल्यामुळे राज्यातील वाढत्या अत्याचारांवर नक्कीच अंकुश लावण्यास मदत होईल.आपण चिमुकल्यांच्या अत्याचारांच्या बाबतीत एक सुरक्षेची ढाल बनून न्याय देण्यास सक्षम आहात ही बाब आपल्या कामगिरीवरून लक्षात येते.त्यामुळे आम्हाला खात्री आहे की,आपण महिला व मुलींवरील वाढत्या अत्याचाराच्या घटना जलदगतीने हाताळून पिडितांना, त्यांच्या नातेवाईकांना व राज्याला न्याय द्याल.जय हिंद.

# गुरुकुल विद्यालयाची दहावी परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद येथील गुरुकुल विद्यालय धर्माबाद हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करीत असते विविध स्पर्धा परीक्षा व उपक्रम राबवीत असते एन. एम. एम.एस, स्कॉलरशिप या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उज्वल यश मिळविले आहे. फेब्रुवारी /मार्च २०२६ मध्ये झालेल्या इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेत विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. यावर्षी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार संपूर्ण जिल्ह्यामध्ये कापीमुक्त अभियान राबविले गेले. प्रशासनाने अतिशय चोख बंदोबस्त करत कॉफीमुक्त अभियान राबविले असतानाही विद्यालयाचा ९७.३६%टक्के असा निकाल लागला आहे.

यावर्षी एकूण ७६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली यापैकी ९०% च्या वर सहा विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ७५ टक्के पेक्षा जास्त २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत प्रथम श्रेणी झालेली विद्यार्थी २३ इतके आहेत. विद्यालयातून प्रथम क्रमांक कृतिका दत्ता शिंदे ९७.४० टक्के गुण मिळवित मराठी माध्यमातून तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. तर द्वितीय क्रमांक नरेश विश्वनाथ येवले ९५%टक्के, तृतीय समीक्षा गंगाधर जगदंबे ९३%, तसेच प्रज्वल शिवराज हांडे ९०.८०%, अथर्व प्रवीण चौडारपवार ९०.४०%, सान्वी उदयकुमार शिल्लारे ९०.२०%,प्रिया साईप्रसाद चौडारपवार ९०% असे गुणानुक्रमे उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ज्योती दगडगावे, सचिव मानसा रेड्डी कँचरला, सर्व सदस्य गटशिक्षणाधिकारी रविशंकर मरकँळे साहेब, केंद्रप्रमुख प्रदीप भगत, आबासाहेब उस्केलवार तसेच संचालक पुंडलिक गोपतवाड, नृसिंहरेड्डी कँचरला, पंडित दगडगावे, लक्ष्मण आगलावे व विद्यालयाचे मुख्याध्यापक मनमोहन कदम सर्व शिक्षकवृंदांनी अभिनंदन केले, पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# कागदावर योजना,गावात कोरडे नळ;माहूर तालुक्यातील २५ टक्के गावे तहानलेलीच

**सरफराज दोसानी**

माहूर - हर घर जलच्या गाजावाज्यात कोट्यवधी रुपये खर्च केले जात असताना प्रत्यक्षात मात्र माहूर तालुक्यातील नागरिक थेंबथेंब पाण्यासाठी वणवण भटकत असल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. जलजीवन मिशनच्या नावाखाली प्रशासनाकडून केवळ कागदी घोडे नाचवले जात असून रखडलेल्या योजनांमुळे ग्रामीण भागातील जनतेचा संताप आता उफाळून आला आहे.

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता प्रमोद बनसोडे यांनी २ मार्च रोजी विविध गावांतील नळ योजना दुरुस्ती व पूरक पाणीपुरवठा योजनांचे कोट्यवधी रुपयांचे प्रस्ताव जिल्हा परिषद नांदेडकडे पाठविले होते. मात्र या प्रस्तावांना तब्बल दोन महिन्यांनंतर, म्हणजेच ३० एप्रिल रोजी मंजुरी देण्यात आली. तोपर्यंत पाणीटंचाईने विक्राळ रूप धारण केले होते. प्रशासनाच्या या ढिम्म कारभारामुळे गावोगावी नागरिकांना पाण्यासाठी अक्षरशः हेलपाटे मारावे लागत आहेत. वानोळा, कुमटी, साकूर, वाई बाजार, चोरड, नाईकवाडी, अजनी, सावरखेड, मलकागुडा तांडा, जेमला नाईक तांडा यांसह अनेक गावांमध्ये नळ योजना कोलमडलेल्या अवस्थेत आहेत. निधी मंजूर होऊनही प्रत्यक्ष कामे मात्र कासवगतीने सुरू असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. विशेष म्हणजे, वानोळा गावासाठी मागील वर्षी मंजूर झालेला सुमारे १० लाख रुपयांचा निधी खर्चच झाला नाही. परिणामी आजही गावकरी पाण्यासाठी भटकंती करत आहेत. यावरून संबंधित यंत्रणा किती निष्क्रिय आणि बेफिकीर आहे, हे स्पष्ट होत असल्याची चर्चा गावागावांत सुरू आहे. मंजुरीनंतर सर्व २२ ग्रामपंचायतींना करारनामे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र आतापर्यंत केवळ दोनच ग्रामपंचायतींनी करारनामे दिल्याची माहिती उपअभियंता प्रमोद बनसोडे यांनी दिली. उर्वरित ग्रामपंचायतींच्या हलगर्जी-पणामुळे पाणी पुरवठ्याची कामे ठप्प पडली आहेत. दरम्यान, जलजीवन मिशनची अवस्था तर अधिकच गंभीर बनली आहे. २०२२-२३ मध्ये तालुक्यातील ५१ गावांसाठी मोठ्या गाजावाज्यात कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. मात्र अपवाद वगळता एकाही गावात योजना पूर्णत्वास गेलेली नाही. हर घर जलचा नारा केवळ फलकांवर आणि कागदावरच झळकत असून प्रत्यक्षात माहूर तालुका तहानलेलाच असल्याचे चित्र आहे. तालुक्यातील तापमान ४२ ते ४३ अंशांवर पोहोचल्याने परिस्थिती आणखी भीषण झाली आहे. वसराम नाईक तांडा, गोंडखेडी, दिगडी, करंजी, भगवती, उमरा, मांडवा, पाचुंदा, पवनाळा, शिऊर, सावरखेड, मदनापूर, आष्टा, टाकळी, रामपूर, महादापूर, हिंगणी, मुंगशी यांसह ५० हून अधिक गावांतील नागरिक पाण्यासाठी हवालदिल झाले आहेत. एका गावात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून दोन गावांसाठी विहीर अधिग्रहणाचे प्रस्ताव पाठविण्यात आल्याची माहिती गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस



यांनी दिली. तालुक्यात पाणीटंचाई जाणवू नये, याकरिता ग्रामीण पाणीटंचाई निवारणासाठी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. आराखड्यानुसार पूरक नळ योजना, नवीन पाणीपुरवठा योजना तसेच दुरुस्तीची कामे हाती घेतली जाणार आहेत. टंचाई काळात प्रशासनाने दक्ष राहून कोणत्याही गावात पाणीटंचाई भासणार नाही याची खबरदारी घ्यावी व आराखड्यातील उपाययोजनांची प्राधान्याने अंमलबजावणी करावी, अशा सूचना आ.भीमराव केराम यांनी दिल्या आहेत. टंचाई कृती आराखड्यातील कामे युद्धपातळीवर पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा पाणी प्रश्नावर जनआक्रोश तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# गोवंशाची वाहतूक करणारे वाहन पोलीसांनी पकडले

नांदेड/प्रतिनिधी-कत्तलीसाठी गोवंश बोलेरो पिकअप वाहनात डांबून घेवून जात असतांना सदरील वाहन गुरुवारी दुपारी रामतिर्थ पोलीसांनी देगलूर रोडवर पकडले असून चार गोवंशाची सुटका केली आहे.



बोलेरो पिकअप वाहनात गोवंश कोंबुन कत्तलीसाठी जात असल्याची माहिती रामतिर्थ पोलीसांना मिळाली. सपोनी विक्रम हराळे व पोलीस कर्मचाऱ्यांनी गुरुवारी दुपारी देगलूर रोडवर बोलेरो पिकअप क्र.एमएच २६-८२२७ हे वाहन थांबवून त्याची तपासणी केली असता त्यामध्ये चार गोवंश दाटीवाटीने बांधलेल्या अवस्थेत आढळून आले. पोलीसांनी चार गोवंश व बोलेरो पिकअप वाहन असा ६ लाख ६४ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. पोलीसांनी वाहन चालक रफिक वहाब साब कुरेशी रा.बेटमोगरा, ता.मुखेड यास अटक केली असून त्याच्या विरुध्द रामतिर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बॅनर पडल्याने तरुण गंभीर जखमी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेडमध्ये आयटीआय ते महात्मा फुले पुतळ्यापासून बस स्टॅन्ड कडे येताना गुरुवारी ७ मे रोजी दुपारच्या सुमारास शिवाजीनगर भागात मोठे बॅनर पडल्याने दुचाकीस्वार तरुण रक्तबंबाळ झाला.



शहरातील शिवाजीनगर परिसरातील बल्लेवार फर्निचर दुकानाजवळ लावलेले मोठे बॅनर दुचाकी स्वार कंधार येथील रहिवासी अमोल भास्करराव उंब्रजकर देशपांडे यांच्या अंगावर अचानक पडले. त्यांच्या डोक्याला जबर मार लागला असून आजूबाजूच्या नागरिकांनी जखमी श्री वेंकटेश्वरा हॉस्पिटल येथे उपचारास नेले. डॉ तुंगेनवार यांनी ५ टाके टाकून युवकावर योग्य उपचार केले. नांदेडमध्ये विनापरवाना बॅनर लावण्याची चढाओढ सुरू आहे. त्यातून रस्त्यावरून येणाऱ्या जाण्याच्या जीवाची पर्वा नसल्याचा संतापजनक प्रकाश घडत आहे.शहराचे विद्रोपीकरण करून सामान्य लोकांच्या जीवाशी जीव घेणा खेळ महापालिका करीत असून महापालिकेसह प्रशासन डोळे झाक करीत असून याकडे कोणाकडे दाद मागावी हा मुळात प्रश्न सामान्य माणसाला पडला आहे. शहरात कोणत्याही राजकीय, स्वयं घोषित सामाजिक नेत्याचा पक्ष पक्ष प्रवेश ,वाढदिवस असो, कुठलेही कोचिंग क्लासेसची जाहिरात असो मनपा यंत्रणेला खिशात घालून ही मंडळी वाट्टेल तसे बॅनर लावतात. कुणाला गंभीर दुखापत होऊ नये अशा प्रकारे काळजी घेताना दिसत नाही. दि.७ मे रोजी दुपारी शिवाजीनगर भागात बॅनर पडून ग्भीर जखमी झालेल्या तरुणाचा जीव वाचला असला तरी उपचाराचा खर्च मनपा व बॅनर लावणारे देणार काय असा सवाल केला जात आहे. या जखमी तरुणाने शिवाजी नगर पोलिस ठाणे. मनपा यंत्रणेला ही लेखी अर्ज देऊन दोषींविरुद्ध कारवाईची मागणी केली आहे.

# एकाच छताखाली नागरिकांना सुविधा मिळाल्याने समाधान-आ.केराम

माहूर/प्रतिनिधी-राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ देत प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. माहूर तहसील कार्यालयाच्या वतीने शुक्रवारी श्री जगदंबा धर्मशाळा येथे आयोजित शिबिरात मोठ्या संख्येने लाभार्थी सहभागी झाले होते.



शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आ.भीमराव केराम यांनी शासनाच्या या उपक्रमाचे कौतुक करताना, हे शिबिर गोरगरीब शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत लाभदायक ठरले आहे. नागरिकांना विविध योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळाल्याने त्यांची कामे वेळेत पूर्ण झाली, याचे समाधान वाटते, असे प्रतिपादन केले. यावेळी तहसीलदार अभिजीत जगताप, नगराध्यक्ष फिरोज दोसानी, मुख्याधिकारी विवेक कांदे, सहाय्यक गटविकास अधिकारी मुरादे, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, नगरसेवक गोपू महामुने, नायब तहसीलदार सौ. सूर्यवंशी आदी उपस्थित होते. प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व सहाय्यक जिल्हाधिकारी जेनित चंद्रा दोन्तूला यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शिबिरात महसूल विभागा मार्फत जात प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र आदी विविध दाखले नागरिकांना वितरित करण्यात आले.

# जिल्हाधिकारी कार्यालयावर २१ रोजी शेतकऱ्यांचा मोटारसायकल महामोर्चा

उमरी/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्यातून वाहत जाणाऱ्या गोदावरी नदीवर तेलंगणा राज्यात, पोचमपाड धरण बांधण्यात आले. धरणाचे अडवलेले बॅक वॉटरचे पाणी महाराष्ट्र राज्यातील उमरी, धर्माबाद आणि नायगाव तालुक्यातील गोदावरी नदीच्या तीरावर असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतात घुसून दरवर्षी पूरग्रस्त परिस्थिती निर्माण होते. परिणामी शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते. त्याबाबत शासनाकडे अनेकवेळा अर्ज, विनंती करुनही तब्बल ४० वर्षांपासूनची या भागातील शेतकऱ्यांना न्याय मिळालेला नाही. पश्चिम पाड बॅक वॉटर पूरग्रस्त शेतकऱ्यांना कोल्हापूर धरणग्रस्त शेतकऱ्यांना लागू असलेला शासन निर्णय येथील शेतकऱ्यांनाही लागू करावा, सर्व पूरग्रस्त शेतकऱ्यांना धरणग्रस्त प्रमाणपत्र प्रदान करावे, पीकविमा न भरणे झालेल्या शेतकऱ्यांना पेरणीपूर्व हेक्टरी २५ हजार रुपये तत्काळ बँक खात्यात जमा करावे, पूर्वाधित गावांचे वेगळे महसूल मंडळ स्थापन करावे, पूरग्रस्त शेतकऱ्यांना पीक कापणी प्रयोगाची अट रद्द करुन महसूलच्या पंचनाम्यानुसार १०० टक्के पीकविमा मंजूर करावा आणि वाढलेल्या खताच्या किमती तत्काळ कमी कराव्यात. इत्यादी मागण्यां संदर्भात नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयावर २१ मे रोजी भव्य मोटारसायकल महामोर्चाचे आयोजन केले आहे. या महामोर्चात तीनही तालुक्यातील हजारो शेतकरी बांधवांनी सामील होण्याचे आवाहन डॉ.भगवान मनूरकर यांनी केले आहे.

# दहावी परीक्षेत कंधार तालुक्याचा ७० टक्के निकाल

कंधार/प्रतिनिधी-फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेचा निकाल शुक्रवार दि.८ मे रोजी जाहीर झाला. यंदा कंधार तालुक्याचा एकूण निकाल ६८.७७ टक्के लागला असून मुलींनी पुन्हा एकदा मुलांपेक्षा सरस कामगिरी केली आहे. तालुक्यात मुलांचे उत्तीर्ण प्रमाण ६२.१४ टक्के, तर मुलींचे उत्तीर्ण प्रमाण ७७.८८ टक्के इतके नोंदवले गेले.

यंदाच्या निकालात कंधार तालुक्यातील संत गाडगेबाबा माध्यमिक विद्यालय, सोमठाणा या शाळेने सर्वाधिक ९५.६५ टक्के निकालाची नोंद करत तालुक्यात अव्वल स्थान पटकावले. तर कंधार शहरातून महात्मा फुले विद्यालय, नवामोंढा या शाळेने ९५.२३ टक्के निकालासह विशेष यश संपादन केले. संत गाडगेबाबा माध्यमिक विद्यालयाने आपल्या उज्ज्वल यशपरंपरेला कायम ठेवत उत्कृष्ट निकाल मिळवला. शाळेतील ७ विद्यार्थी विशेष प्राविण्य, ५ विद्यार्थी प्रथम श्रेणी, तर १० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. तर कँधार शहरातील महात्मा फुले विद्यालये चे गुणवंत विद्धयार्थी कु कांचन सुभाष मुसळे ९६.२०, रोहन कंटीराम मुसळे ९५.२०, कु.मानसी उमेश बिजले ९०.४० असे यश संपादन करत शाळेचा निकाल ९५.२३ एवढा लागला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डी. एन. केंद्रे, कोषाध्यक्षा सौ. मुक्ताबाई दौलत केंद्रे, सचिव चेतनभाऊ केंद्रे, तसेच मुख्याध्यापिका अनुराधा चेतन केंद्रे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यंदा कंधार तालुक्यातून एकूण ३६२८ विद्यार्थी दहावी परीक्षेला बसले होते. त्यामध्ये २०७१ मुले व १५५७ मुलींचा समावेश होता. त्यापैकी मोठ्या संख्येने विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून तालुक्याचा निकाल समाधानकारक मानला जात आहे. तालुक्यातील इतर शाळांचाही निकाल उल्लेखनीय लागला असून त्यामध्ये संत नामदेव महाराज माध्यमिक विद्यालय, पानशेवडी ९४.२८ टक्के, श्री शिवाजी विद्यालय, दिग्रस ८४.९३ टक्के, माणिक प्रभू विद्यालय, अंबुलगा ८३.५६ टक्के, प्रियदर्शनी माध्यमिक विद्यालय, कँधार ८२.६६ टक्के, मनोविकास विद्यालय ८१.२५ टक्के, श्री शिवाजी विद्यालय, कँधार ७४.६३ टक्के लागला आहे.

# जुगार अड्डयावर तामसा पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-तामसा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मौजे पिंपळगाव शिवारात सुरु असलेल्या जुगार अड्डयावर शुक्रवारी दुपारी तामसा पोलीसांनी धाड टाकुन जुगार खेळणाऱ्या पाच जणांना अटक करण्यात आली.

मौजे पिंपळगाव शिवारातील एका शेतामध्ये जुगार अड्डा सुरु झाला होता. तामसा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरिक्षक शहादेव खेडकर व पोलीस कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी दुपारी सदरील जुगार अड्डयावर धाड टाकली. पैसे लावून झन्नामन्ना नावाचा जुगार खेळत असतांना मनोहर व्यंकट जाधव (वय ३८), मारोती फुलसिंग पवार (वय ४८), रामराव लिंबाजी चव्हाण (वय ६०), तारासिंग महादु राठोड रा. पिंपळगाव, बालाजी तुकाराम डोणेवार (वय ५०) रा.येवली तांडा यांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून ६ हजार ५०० रुपये रोख व जुगाराचे साहित्य आढळून आले. याप्रकरणी तामसा पोलीस ठाण्यात पाच जणांविरुध्द मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्रद्धा बाऱ्हाळीकर दहावी परीक्षेत ९९ टक्के गुण घेवून उत्तीर्ण

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील पासदगाव येथील होलिसिटी पब्लिक स्कूल या शाळेची विद्यार्थिनी श्रद्धा दीपक बाऱ्हाळीकर हिने दहावीच्या परीक्षेत ९९ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



लहानपणापासूनच अभ्यासू, मेहनती आणि जिज्ञासू स्वभावाची असलेली श्रद्धा पहिलीपासूनच ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करत होती. दहावीच्या निकालातही तिने उत्कृष्ट यश संपादन करत शाळेचा गौरव वाढविला आहे. या यशामागे नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन महत्त्वाचे असल्याचे श्रद्धाने सांगितले. शाळेचे प्राचार्य मोहम्मद अर्शद, उपप्राचार्य सुजाता नाईक तसेच वर्गशिक्षिका रश्मी यंदे, संस्कृत शिक्षिका वर्षा माळवतकर, सुनील पाटील, रिना पाटीलकर, बाळासाहेब पवार आणि स्वाती जोशी यांचे तिला मोलाचे मार्गदर्शन लाभले. श्रद्धा ही दैनिक सामनाचे नांदेड शहर प्रतिनिधी दीपक बाऱ्हाळीकर यांची कन्या असून, तिच्या या यशामुळे कुटुंबासह शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तिच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**जाहीर प्रगटन**

दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,लोहा, ता.लोहा जि.नांदेड श्रीमती पी.व्ही.चिद्रे यांच्या न्यायालयात
पदमीनबाई व इतर वि निरंक

अर्जदार : १) पदमीनबाई नरबा लोहकरे वय ७३ वर्षे, धंदा घरकाम, २) कामाजी नरबाजी लोहकरे वय ४३ वर्षे धंदा शेती, ३) माधवराव नरबाजी लोहकरे वय ४० वर्षे धंदा शेती, ४) बालाजी नरबाजी लोहकरे वय ३८ वर्षे धंदा शेती सर्व रा.कांजळा ता.लोहा जि.नांदेड, ५) सागरबाई दिगांबर जाधव वय ५२ वर्षे धंदा घरकाम, रा.करमाळा ता.लोहा जि.नांदेड, ६) वच्छलाबाई संभाजी शिंदे वय ५० वर्षे धंदा घरकाम रा.जोमेगाव ता.लोहा जि.नांदेड, ७) आरुणाबाई भगवान मोरे वय ४७ वर्षे धंदा घरकाम रा.जोशी सांगवी ता.लोहा जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निल

दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट (VIII) १८२७ च्या नियमानुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज.

ज्याअर्थी नरबा मारोती लोहकरे हे दिनांक २१/०८/२०२५ रोजी कांजळा ता.लोहा येथे मरण पावले आणि वरिल अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ ते ४ हे मुले व अर्जदार क्र.५ ते ७ ह्या मयताची मुलगी आहे. अर्ज सादर केला आहे. त्यापेक्षा सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या घोषणेच्या तारखेपासून एक महिन्याचे आत वरिल न्यायालयामध्ये हजर होउन आक्षेप नोंदवावा, आणि याद्वारे असे जाहिर केले गेले आहे की, सदर मुदत संपण्यापुर्वी आक्षेप घेतला नाही तर सदरहू कोर्ट अर्जदार ह्यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेउन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत अनुसयाबाई मोतीराम गुध्दे यांचे कायदेशिर वारसाचे प्रमाणपत्र देईल.

आज तारीख-०५/०५/२०२६
पुढील नेमलेली तारीख-१५/०६/२०२६

स्वाक्षरित/- **क.लि.**
स्वाक्षरित/- **सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय,क.स्तर,लोहा

CHANGE IN NAME

My (old name) is **MRUNALINI NIVRUTTINATH KOMAWAR** which now I am, changing as (new name) **MRUNAL KAPIL CHINTAWAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MRUNAL KAPIL CHINTAWAR**
R/o H.no.1-12-637, Bhagya nagar road
Uday nagar Nanded-431605
M.No.-9822299989

# गोडाऊन व बारदाना उपलब्ध नसल्याने भरड धान्याची खरेदी रखडली

किनवट/प्रतिनिधी- कृषी प्रधान महाराष्ट्रातील शासन आणि प्रशासनाच्या उदासिनतेमुळे १ मे पासून सुरू करण्यात येणाऱ्या भरडधान्याची खरेदी रखडली आहे. गोदाऊन आणि बारदाना उपलब्ध नसल्याची सबब दाखवून दरवर्षीच मागास किनवट तालुक्यातील शेतकऱ्यांची परवड त्यांच्या पाचवीलाच पुजली आहे. ऐनवेळी अनेक लोकनेते पैदा होऊन आश्वासनांचे वरपांगी वरातीमागून घोडे हे नित्याचेच आहे.

आदिवासी विकास महामंडळाच्या उपप्रादेशिक व्यवस्थापकांनी दिलेली ग्वाही कुठे पेंड खातेय? ९ मे उजाडला परंतु प्रत्यक्ष खरेदी केंद्र कार्यान्वित झालेली नसल्यामुळे सरकार ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचे भरडधान्य खरेदी करणार की, सडवत ठेवणार? याबद्दल शेतकऱ्यांमध्ये धाकधूक चालू झाल्याचे पहायला मिळते. ऑनलाईन नोंदणी केलेल्या सर्वच शेतकऱ्यांचे धान्य खरेदी करण्याचा अवसान नसेल तर व्यापारपेठ आणि आधारभूत हमी भाव योजनेतील किमान फरकाची रक्कम तरी हतबल झालेल्या शेतकऱ्यांच्या पदरी देण्याची व्यवस्था करावी, अशी शेतकऱ्यांची एकमुखी मागणी आहे. शासनाच्या कापूस खरेदी केंद्र, सोयाबीन खरेदी, मका आणि ज्वारीच्या आधारभूत हमी भाव योजनेचे खरेदी केंद्र सुरु करण्यापासून ते पुन्हा पुन्हा मुद्दत वाढ मिळवून गोडाऊन आणि बारदाना उपलब्ध करून देण्यासाठी तत्कालीन खासदार तथा आ. हेमंत पाटलांचे योगदान हे अतुलनीय आहे. आज मितीस तालुका प्रशासनावर कोणत्याही नेत्यांचा अंकुश असेल असे प्रशासनाच्या निर्लगाम कार्यपद्धतीवरुन तरी दिसते. १३ ते ३० एप्रिलपर्यंत ज्वारी व मका उत्पादक शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणीसाठी चपला झिजवल्या. दरम्यान स्थानिक आदिवासी विकास महामंडळाच्या उपप्रादेशिक व्यवस्थापकांनी १ मे पासून प्रत्यक्ष खरेदीला सुरुवात करुन ३० जूनपर्यंत भरडधान्य स्विकारले जाणार अशी शेतकऱ्यांना ग्वाही दिली होती. आज माहे मेच्या दुसऱ्या आठवड्याला सुरुवात झाली मात्र खरेदीच्या नावे शुन्यच. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये धाकधूक होणे स्वाभाविक आहे. कारणमिमांसा पहाता खरीप हंगाम २०२६ च्या पेरणीपूर्वीची कामे आटोपून बि-बियाण्यांची तयारी करण्याची वेळ असून याच ज्वारी आणि मकावरच शेतकऱ्यांची बिस्त होती. ज्वारीला ३,६९० रुपये आणि मकाला २,४०० रुपये हमी भाव असलातरी आता व्यापाऱ्यांशिवाय शेतकऱ्यांना पर्याय नसून १,६०० रुपये मका आणि ज्वारी १,८००-२,००० रुपये भावाने खरेदी चालू असून शेतकऱ्यांना खिंडीत गाठले आहे. जिल्हाधिकारी, सहाय्यक जिल्हाधिकारी, तहसीलदार यांनी पेसा अंर्तगतच्या आदिवासी बहुल तालुक्यातील गरजू शेतकऱ्यांची होत असलेली लूट थांबविण्यासाठी ठोस पाऊल उचलण्याची मागणी जोर धरू लागलीय. आ. भीमराव केराम आणि आ. हेमंत पाटील यांनी आपापल्या स्तरावर शासनाकडे पाठपुरावा करून एकतर धान्य खरेदी करण्यासाठी शासनाला भाग पाडा अन्यथा शेतकऱ्यांच्या पदरात फरकाची रक्कम तरी मिळवून द्यायला हवी.

# विकास लवांडे यांच्यावरील शाईहल्ला वारकरी संप्रदायाचा अपमान-हर्षवर्धन सपकाळ



मुंबई/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प.) प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावरील शाईहल्ला, धक्काबुक्की व शिवीगाळ हा भ्याड हल्ला असून हल्लेखोर वारकरी संप्रदायाच्या विचाराला माननारे नाहीत. या प्रकरणाला भाजपाची चिथावणी असून अशा हल्लेखोरांना भाजपा सरकार संरक्षण देत आले आहे. विकास लवांडे यांच्यावरील हल्ला हा वारकरी संप्रदायाचा अपमान आहे, या हल्लेखोरांवर कठोर कारवाई करा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, विकास लवांडे यांच्यावरील हल्ल्याचा काँग्रेस पक्ष तीव्र शब्दात निषेध करत आहे. विकास लवांडे हे वारकरी संप्रदायाचा समता, बुंधता व सामाजिक न्यायाचा विचार पुढे घेऊन जाणारे आहेत. वारकरी संप्रदायात मनुवादी विचार वाढत आहे, ही चिंता त्यांनी व्यक्त केली होती, ती या हल्ल्याने खरी करून दाखवली आहे. मूठभर लोकांच्या हाती धर्मसत्ता व राजसत्ता असावी या विचाराचा मोठा फटका छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अनेक साधू संतांनाही बसला आहे. संत तुकाराम महाराजांच्या गाथा बुडवणारे, संत ज्ञानेश्वर यांना छळणारे, सावित्रिबाई फुले यांना छळणारा विचार हाच आहे. या मनुवादी विचाराला कंटाळून गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माची स्थापना केली, महाविरांनी जैन धर्माची स्थापना केली, हीच परंपरा महात्मा बसवेश्वर पुढे घेऊन गेले. हा मनुवादी विचार भाजपा व रा. स्व. संघाचा आहे, याच विचाराने दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी यांनाही छळले आहे.

# वाचाल,तर वाचाल, म्हणता;मात्र आम्ही जगायचे कशे?

## ग्रंथालय संचालकांचा प्रश्न : अनुदान वाढीची घोषणा हवेतच

नरसिंग अनमवार

देगलूर/प्रतिनिधी-ग्रंथालयांना ज्ञानाची मंदिरे संबोधले जाते. मात्र हीच मंदिरे सध्या सरकारच्या उदासीन धोरणामुळे मोडकळीस आले आहे.अलीकडच्या काळात एकाही नवीन सार्वजनिक वाचनालयाला शासनाने मान्यता दिली नाही. त्यातच मागील काही वर्षापासून ४० टक्के अनुदानाची घोषणाही हवेतच आहे. वाचाल तर वाचाल असे म्हटले जाते. मात्र आम्ही जगायचे कसे, ते आता सांगा असे म्हणण्याची वेळ ग्रंथालय संचालकावर आली आहे.

शासनाच्या वतीने गाव तेथे ग्रंथालयची घोषणा करण्यात आली होती. मात्र २०१२ पासून नवीन ग्रंथालयाला मान्यता देण्यात हात आकडता घेण्यात आला. आता या काळात वाचन संस्कृती वृक्षविण्यासाठी हजारो संस्थांनी ग्रंथालयासाठी प्रस्ताव सादर केले. मात्र शासनाने त्यावर कोणताही सकारात्मक निर्णय घेतलेला नाही. गावागावात वाचन संस्कृती रुजवण्यासाठी धडपडणारे कार्यकर्ते आता हाताशी झाले आहेत. डिजिटलच्या काळात वाचन संस्कृती मागे पडत चालली आहे. नवीन ग्रंथालय सुरू न होणे ही एक मोठी संस्कृती हानी जात आहे. गाव तेथे ग्रंथालयाची घोषणा ऐकून अनेकांनी प्रस्ताव टाकले मात्र ते प्रस्ताव अडगळीत पडली आहेत. वाढती महागाई कर्मचाऱ्यांची अत्यल्प पगार आणि इमारतीचे भाडे यामुळे ग्रंथालय चालवणे कठीण झाले आहे. सरकारने वारंवार ग्रंथालयाच्या अनुदानात ४० टक्के वाढ करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र त्यावर कोणताही सकारात्मक निर्णय घेण्यात आला नाही. तुटपुंज्या अनुदानावर ग्रंथपाल आणि कर्मचाऱ्यांनी जगायची कसे, हा प्रश्न उभा राहिला आहे. जिल्ह्यात पूर्वी मोठ्या प्रमाणावर ग्रंथालय चालवली जात होती. स्पर्धा परीक्षा व महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्यासाठी ग्रंथालयाने माहितीची जाळे उभे केले होते. मात्र शासनाकडून होणाऱ्या दुर्लक्षामुळे वाचन संस्कृती मागे पडली. त्यातच काही ग्रंथालयाकडून नियमाचे पालनही होत नाही परिणामी जानेवारी २०२६ मध्ये अनेक ग्रंथालयाना गाशा क्षणातघ गाश गुंडाळला आहे.



(छाया : विजय होकर्णे)

उन्हाच्या झळांनी व्याकूळ झालेली लहान मुले हातपंपाभोवती खेळत, अंघोळ करत उन्हाची तीव्रता विसरण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद क्षणिक असला, तरी पाण्याचे महत्त्व अधोरेखित करून जातो.

# जालन्यात ॲड.गुणरत्न सदावर्तेंच्या कारवर मनसैनिकांची शाईफेक

जालन्यात ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या गाडीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी शाई आणि सुपारी फेक्र केली आहे. ज्या गाडीवर शाई आणि सुपारी फेक्रल्या त्या गाडीत गुणरत्न सदावर्ते यांची पत्नी आणि मुलगी होती. जालना शहरातल्या विशाल कॉर्नर परिसरात ही घटना घडली आहे. गुणरत्न सदावर्ते आज जालना दौऱ्यावर असताना ही घटना घडली आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जालना शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे यांच्यासह अजून काही पदाधिकाऱ्यांकडून ही शाई फेक्र करण्यात आली आहे. मागील काही दिवसांपूर्वी मुंबईतील रिक्षा चालकांच्या संदर्भात मराठी अमराठी यावादावर गुणरत्न सदावर्ते यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यावार टीका केल्यानंतर जालन्यात मनसैनिक आक्रमक झाले होते. चंदनझिरा पोलिसांकडून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पाच जणांना ताब्यात घेण्यात आलं आहे.

# माहूर तालुक्याचा दहावी परीक्षेचा निकाल ७२ टक्के

माहूर/प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेचा निकाल गुरुवार दि.८ मे रोजी दुपारी जाहीर झाला. माहूर तालुक्याचा एकूण निकाल ७२.६४ टक्के लागला आहे. तालुक्यातील २४ शैक्षणिक संस्था व शाळांमधून परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी ८७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

यावर्षी जीनियस किड्स इंटरनॅशनल स्कूल, माहूर आणि मॉर्डन इंग्लिश स्कूल, माहूर या दोन्ही शाळांनी शंभर टक्के निकालाची किमया साधत तालुक्यात संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला आहे. तालुक्यातील विविध शाळांमधून एकूण १२२५ विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले होते. त्यापैकी १२१० विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला बसले. यामध्ये ८७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून १०३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले आहे. तसेच २१४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ३०५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर २५७ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत यशस्वी झाले आहेत. जीनियस किड्स इंटरनॅशनल स्कूल, माहूर येथील परीक्षेला बसलेले सर्व २९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर मॉर्डन इंग्लिश स्कूल, माहूर येथील सर्व १३ विद्यार्थी यशस्वी ठरले आहेत. याशिवाय श्री सुभाष विद्यालय, गोकुळ (गोंडेगाव) या शाळेने ९६.६६ टक्के निकालासह तालुक्यात द्वितीय स्थान मिळविले. अनुसूचित जाती मुलींची शासकीय निवासी शाळा, माहूर हिने ९२.८५ टक्के निकालासह तृतीय स्थान पटकावले. सह्याद्री पब्लिक स्कूल, माहूरचा निकाल ९१.६६ टक्के लागला असून ही शाळा चौथ्या स्थानावर आहे. तर कै. गोविंदराव पाटील माध्यमिक विद्यालय, वझरा (शेफ) हिने ८८.३७ टक्के निकालासह पाचवे स्थान मिळविले आहे. दरम्यान, वाई बाजार येथील वसंतराव नाईक विद्यालयाचा निकाल शून्य टक्के लागल्याने शैक्षणिक क्षेत्रात आश्चर्य व्यक्त केले जात आहे. श्री जगदंबा हायस्कूल, माहूर ७३.२३ टक्के, श्री सुभाष विद्यालय, गोकुळ ९६.६६ टक्के, वसंतराव नाईक विद्यालय, वाई बाजार ०० टक्के, वसंतराव नाईक विद्यालय, वानोळा ७१.४२ टक्के, सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, अंजनखेड ८१.४० टक्के, श्री वसंतराव नाईक विद्यालय, सिंदखेड ७८.३३ टक्के वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय, अनमाळ ८०.०० टक्के, श्री शंकरराव चव्हाण विद्यालय, आष्टा ६५.४३ टक्के कै. पार्वतीबाई कन्या माध्यमिक शाळा, वाई बाजार ७१.४९ टक्के कै. देवरावजी पाटील माध्यमिक विद्यालय, अनंतवाडी-कुमटी ७६.४७ टक्के, शासकीय पोस्ट बेसिक आश्रमशाळा, तुळशी ७३.३३ टक्के, छत्रपती संभाजी महाराज हायस्कूल, मदनापूर ६९.०४ टक्के, राष्ट्रमाता गुरुकुल, हडसनी ७६ टक्के, कै. ग्यानबाजी केशवे माध्यमिक विद्यालय, माहूर ४८ टक्के, कै.गोविंदराव पाटील माध्यमिक विद्यालय, वझरा (शेफ) ८८.३७ टक्के, पंचशील माध्यमिक विद्यालय, लखमापूर ३३.३३ टक्के, माध्यमिक विद्यालय, तुळशी (परिसर) ५० टक्के, अनुसूचित जाती मुलींची शासकीय निवासी शाळा, माहूर ९२.८५ टक्के, सह्याद्री पब्लिक स्कूल, माहूर ९१.६६ टक्के, जीनियस किड्स इंटरनॅशनल स्कूल, माहूर १०० टक्के, मॉर्डन इंग्लिश स्कूल, माहूर १०० टक्के, शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, माहूर ५६.२५ टक्के, पीएम श्री झेडपी हायस्कूल, वाई (बाजार) ७३.९१ टक्के असा तालुक्याचा निकाल असून १२ वी पाठोपाठ १० वी च्या निकालात ही प्रस्तापित राजकीज नेत्यांच्या शाळांचा निकाली टक्का घसरल्याचे दिसून येते.

# आदिवासी मुलींचे शैक्षणिक संकुलनाचा ७६ टक्के निकाल



मांडवी/प्रतिनिधी-संधी निकेतन शिक्षण संस्था, वडगाव द्वारा संचलित आदिवासी मुलींचे शैक्षणिक संकुल, पिंपळगाव फाटा येथील इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाला असून, शाळेने याही वर्षी ७६ टक्के निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे.

या परीक्षेत आरती वामन धामणेवाड हिने ६९.०० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. आणि द्वितीय वैष्णवी जनार्धन तोडसाम ६१.५०% तृतीय क्रमांक ममता मोहन तोडसाम ६०.००% संस्थेकडून कौतुकाचा वर्षाव दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थिनींनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेल्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. या यशाबद्दल संधी निकेतन शिक्षण संस्थेचे सचिव नि. म. वडगावकर यांनी विद्यार्थिनींचे विशेष अभिनंदन केले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक वृंदाने यशस्वी विद्यार्थिनींना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.


CHANGE IN NAME

My (old name) is **SEEMA AFROZ KHAN** which now I am, changing as (new name) **BAIG SEEMA NAZEER**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**BAIG SEEMA NAZEER**

R/o plot no.69, new Hitupdesh hos soc

jatwada road Harsul Aurangabad-431001

M.No.-7887355404


# चोरी,घरफोडीच्या घटनेतील दोन आरोपींना एलसीबीने केली अटक



नांदेड/प्रतिनिधी-चोरी, घरफोडीच्या घटनेतील दोन आरोपींना स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी आज (शनिवार) सकाळी जुना कौठा भागातील मोदी ग्राऊंड मैदानाजवळ अटक केली आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या निर्देशावरुन फौजदार साईनाथ पुयड व पोलीस कर्मचारी गस्त घालीत असतांना खबऱ्याकडून मिळालेल्या गुप्त माहितीवरुन दुचाकीवर दोन संशयीत इसम हे चोरीच्या घटनेतील रक्कम घेवून जात असल्याची माहिती मिळाली. पोलीसांनी जुना कौठा भागातील मोदी ग्राऊंड जवळ दीपकसिंग किशोरसिंग तिलपितीया (वय १९) व महेंद्रसिंग उर्फ सनी देवेंद्रसिंग भोसीवाले (वय १९) दोघे रा.सखोजीनगर, नांदेड यांना अटक केली. त्यांच्याकडून एक दुचाकी व रोख रक्कम असा १ लाख ६ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. पोलीसांनी त्यांची कसुन चौकशी केली असता त्यांनी जोगिंदरसिंघ टाक उर्फ चव्हाण रा.वसमत यांच्या मदतीने कंधार, हिमायतनगर, लोहा, देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) तसेच नांदेड शहरातील विमानतळ व नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत चोरी व घरफोडी केल्याची कबुली आरोपींनी दिली.

# उमरखेड बसस्थानकातून दोन महिलांचे मंगळसूत्र चोरट्यांनी केले लंपास

उमरखेड/प्रतिनिधी- उमरखेड शहरातील मध्यवर्ती बसस्थानकातून दोन महिलांचे सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना शुक्रवार दि.८ मे रोजी घडली आहे.

श्रीमती निलाबाई विनकरे यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, नांदेड येथील नातेवाईकांकडे विवाह समारंभ आटोपून बसने शुक्रवार दि.८ मे रोजी उमरखेड बसस्थानकावर आले होते. ढाणकी या आपल्या गावी परत जाण्यासाठी दुपारी साडेबाराच्या दरम्यान जेवली-उमरखेड या बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील एक ग्राम सोन्याचे १४ मणी, दोन ग्रॅमचे दोन मंगळसूत्र याची किंमत अंदाजे २० हजार रुपये तसेच सौ.जनाबाई यादवराव धात्रक वय ५५ वर्षे यांच्या गळ्यातील २० सोन्याचे मणी ,एक ग्रामचे दोन मंगळसूत्र याची अंदाजे २५ हजार असा ४५ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने लंपास केला आहे. या प्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ वरुन

## पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रिपदी...

कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. आज, शुभेंदू अधिकारी यांच्यासोबत इतर पाच नेत्यांनी शपथ घेतली. यामध्ये दिलीप घोष, अग्निमित्र पॉल, अशोक कीर्तनिया, खुदीराम टुडू आणि निसिथ प्रमाणिक यांचा समावेश आहे.

## अहमदपुर येथे जुगार अड्डयावर...

रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. या प्रकरणी ९ जणांविरुध्द अहमदपूर पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक फौजदार प्रकाश चिमनदरे हे करीत आहेत.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४